







म. ग्रं. सं. ठाणें
विषय का. वा.
वा. क्र.





१६४५८
बा.वा.
वाचनालय



# धन्य ती मातृभक्ति

१६०७८ 30/3/68
बा.वा.

लेखक

पंडित देशपांडे

[redacted]

किंमत

एक रुपया

मंगल प्रकाशन : नागपूर १०

प्रकाशिका :

सौ. विणा तिजारे,
मंगल प्रकाशन,
८५, माधवनगर,
नागपूर १०.

सर्वाधिकार :

मंगल प्रकाशन

प्रथमावृत्ति :

१५ ऑगस्ट १९७४

मुद्रक :

श्रीकांत रा. बेडेकर
मोहन प्रिंटर्स,
धंतोली,
नागपूर-१२.

कथानुक्रम

१ धन्य ती मातृभक्ति
२ हृदयाची श्रीमंती
३ राजकुमार वदनचन्द्र
४ कर्तबगार राजपुत्र
५ आज्ञाधारक नोकर

ग्र. १६७७८ ३०/३/७६
वि: वा. वा.

# धन्य ती मातृभक्ति

फार दिवसांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्यावेळीं अयोध्या नगरांत प्रभु रामचंद्र राज्य करीत होते. प्रभु रामचंद्राचें राज्य अगदीं भरभराटीस आलेले होते. जिकडे तिकडे सुखा-समाधानाचे वातावरण पसरलेलें दिसत होतें.

त्या अयोध्येमध्यें एक गरीब मुलगा आपल्या आईसह मोठ्या आनंदाने रहात होता. रोज सकाळीं उठावें, रानांत जावे. लाकडे तोडून आणावी आणि ती विकून मिळेल त्या पैशाचे धान्य आणून ती दोघं मायलेकरें गरिबीला तोंड देण्याचा प्रयत्न करीत होती. आपल्या मुलाला नामांकित करावें अशी त्या मुलाच्या आईची फारच इच्छा होती. परन्तु परिस्थिति अतिशयच बिकट असल्यामळें तिला आपल्या सर्व आशा आकांक्षा मनातच ठेवणें भाग पडलें. आपल्या एकुलत्या एक मुलाच्या सुखासाठीं आपणाला कांहीच करतां येत नाहीं असें पाहून तिचें मन नेहमी उदास असे.

आलेल्या पैशांतून बाजरी दळून तो भाकरी करीत असेल. भाकरी करून तो त्यावर चटणी कांदा घेऊन रानांत येईल त्यावेळीं तुझी इच्छा असली तर मला त्या मुळाबरोबर पोटभर जेवण करूं दे म्हणजे मग मला तूं खुशाल खा. माझा मुलगा दररोज छान स्वयंपाक करतो. त्याच्या हातचें हें शेवटचें जेवण मला जेवूं देशील तर माझ्यावर तुझें अनंत उपकार होतील' असें म्हणून त्या म्हातारीने वनराजाचें पाय धरलें. म्हातारीचें बोलणें ऐकून सिंहाला, अतिशयच आनंद झाला. तो म्हणाला ठीक आहे. तुझा मुलगा येईपर्यंत मी वाट पहातो.' असें म्हणून सिंह अेका झाडा-आड लपून बसला. इकडे मुलानें मोळी विकून आलेल्या पैशांतून थोडी लसणाची पात विकत घेतली. थोड्या मिरच्या घेतल्या व नंतर बाजरी घेऊन तो घरीं आला. बाजरी दळल्यानंतर त्यानें सुरेख ५–६ भाकरी भाजल्यानंतर चटणी वाटली व ती भाकरी-वर ठेवली आणि खिशांत २–४ कांदे, हातांत पाण्याची कळशी घेऊन तो जंगलाचा रस्ता आक्रमण करूं लागला. थोडा वेळ चाले, पुन्हां बसे अशी त्याची स्थिति होत होती. दोन दिवस पोटांत अन्नाचा कण अजिबात न गेल्यामुळें त्याला बिलकुल चालवत नव्हते. जंगलांत आई पण उपाशी तेव्हां आपण अेक-ट्यानें खात बसण्यापेक्षां आईबरोबरच आपण जेवण करूं या आशेनें तो झोकांड्या जरी खात होता तरी झपाझप पाऊलें टाकण्याकडे त्याचें लक्ष होते. बऱ्याच वेळानें तो जंगलांत येऊन पोहोंचला.

घाईघाईनें त्यानें आपल्या दशम्या सोडल्या आणि ती दोघे मायलेकरें दशम्या खाण्यांस बसणार इतक्यांत अेक गगनभेदी आरोळी त्यांना अैकूं आली आणि त्या पाठोपाठच वनराज अक्राळ

एके दिवशीं दुपारची वेळ होती. मुलगा आपलीं मोळी तयार करून गावांत विकायला आला होता आणि म्हातारी कुऱ्हाडीने लांकडे फोडीत होती. एक दोन मोळीचें लांकडे फोडून झाले असतील नसतील तोंच . . . एका दाट जंगलाच्या वृक्ष-राजींतून एक सिंह मोठमोठ्यानें गर्जना करीत आपला मार्ग आक्रमण करीत असल्याचें त्या म्हातारीला दिसले. वार्धक्याचा तंबू सर्वांगावर ठाकला गेलेला असल्यामुळे बिचारीला इकडे तिकडे पळणें अगदीच अशक्य असे झाले होते. म्हणूनच ती जरी घाबरली होती तरी झटकन जवळच्याच झुडूपाआड लपून बसली.

सिंह मोठमोठ्यानें गर्जना करीत आपला मार्ग आक्रमण करीतच होता. सबंध अरण्य सकाळपासून पालथे करून देखील त्याच्या पोटांत पाण्याशिवाय कांहींच गेलें नव्हतें. त्याचा जीव भुकेने अगदींच व्याकूळ झाला होता. मोठ्या आशेनें तो इकडे तिकडे पहात चालला असतांनाच त्याचें डोळे एकाएकी आनंदानें चमकले. अन् मोठमोठ्या गगनभेदी गर्जना करीत तो म्हातारीकडे येऊं लागला.

म्हातारीला सिंह आलेला दिसताच तिनें त्याला नमस्कार केला आणि म्हणाली.

'हे वनराजा. तूं भुकेला आहेस हे मला माहीत आहे. आज दोन दिवस झाले माझ्याहि पोटांत कांही नाहीं. आम्ही दोघं मायलेकरें आजारी असल्यामुळें रानांत येऊं शकलो नाहीं. त्यामुळे आम्ही उपाशींच आहोंत. आज जेव्हां बरें वाटलें तेव्हां आम्ही दोघं रानांत आलों आहोंत. माझा मुलगा थोड्याच वेळापूर्वी मोळी विकावयास गावात गेला आहे. एव्हाना त्यानें मोळी विकून

आलेल्या पैशांतून बाजरी दळून तो भाकरी करीत असेल. भाकरी करून तो त्यावर चटणी कांदा घेऊन रानांत येईल त्यावेळीं तुझी इच्छा असली तर मला त्या मुलाबरोबर पोटभर जेवण करूं दे म्हणजे मग मला तूं खुशाल खा. माझा मुलगा दररोज छान स्वयंपाक करतो. त्याच्या हातचें हें शेवटचें जेवण मला जेवूं देशील तर माझ्यावर तुझें अनंत उपकार होतील' असें म्हणून त्या म्हातारीने वनराजाचें पाय धरलें. म्हातारीचें बोलणें ऐकून सिंहाला, अतिशयच आनंद झाला. तो म्हणाला ठीक आहे. तुझा मुलगा येईपर्यंत मी वाट पहातो.' असें म्हणून सिंह अेका झाडा-आड लपून बसला. इकडे मुलानें मोळी विकून आलेल्या पैशांतून थोडी लसणाची पात विकत घेतली. थोड्या मिरच्या घेतल्या व नंतर बाजरी घेऊन तो घरीं आला. बाजरी दळल्यानंतर त्यानें सुरेख ५–६ भाकरी भाजल्यानंतर चटणी वाटली व ती भाकरी-वर ठेवली आणि खिशांत २–४ कांदे, हातांत पाण्याची कळशी घेऊन तो जंगलाचा रस्ता आक्रमण करूं लागला. थोडा वेळ चाले, पुन्हां बसे अशी त्याची स्थिति होत होती. दोन दिवस पोटांत अन्नाचा कण अजिबात न गेल्यामुळें त्याला बिलकुल चालवत नव्हते. जंगलांत आई पण उपाशी तेव्हां आपण अेक-ट्यानें खात बसण्यापेक्षां आईबरोबरच आपण जेवण करूं या आशेनें तो झोकांड्या जरी खात होता तरी झपाझप पाऊलें टाकण्याकडे त्याचें लक्ष होते. बऱ्याच वेळानें तो जंगलांत येऊन पोहोंचला.

घाईघाईनें त्यानें आपल्या दशम्या सोडल्या आणि ती दोघे मायलेकरें दशम्या खाण्यांस बसणार इतक्यांत अेक गगनभेदी आरोळी त्यांना अैकूं आली आणि त्या पाठोपाठच वनराज अकाळ

एके दिवशीं दुपारची वेळ होती. मुलगा आपलीं मोळी तयार करून गावांत विकायला आला होता आणि म्हातारी कुऱ्हाडीने लांकडे फोडीत होती. एक दोन मोळीचें लांकडे फोडून झाले असतील नसतील तोंच . . . एका दाट जंगलाच्या वृक्ष-राजींतून एक सिंह मोठमोठ्यानें गर्जना करीत आपला मार्ग आक्रमण करीत असल्याचें त्या म्हातारीला दिसले. वार्धक्याचा तंबू सर्वांगावर ठाकला गेलेला असल्यामुळे बिचारीला इकडे तिकडे पळणें अगदीच अशक्य असे झाले होते. म्हणूनच ती जरी घाबरली होती तरी झटकन जवळच्याच झुडूपाआड लपून बसली.

सिंह मोठमोठ्यानें गर्जना करीत आपला मार्ग आक्रमण करीतच होता. सबंध अरण्य सकाळपासून पालथे करून देखील त्याच्या पोटांत पाण्याशिवाय कांहींच गेलें नव्हतें. त्याचा जीव भुकेने अगदींच व्याकूळ झाला होता. मोठ्या आशेनें तो इकडे तिकडे पहात चालला असतांनाच त्याचें डोळे एकाएकी आनंदानें चमकले. अन् मोठमोठ्या गगनभेदी गर्जना करीत तो म्हातारीकडे येऊं लागला.

म्हातारीला सिंह आलेला दिसताच तिनें त्याला नमस्कार केला आणि म्हणाली.

'हे वनराजा. तूं भुकेला आहेस हे मला माहीत आहे. आज दोन दिवस झाले माझ्याहि पोटांत कांही नाहीं. आम्ही दोघं मायलेकरें आजारी असल्यामुळें रानांत येऊं शकलो नाहीं. त्यामुळें आम्ही उपाशींच आहोंत. आज जेव्हां बरें वाटलें तेव्हां आम्ही दोघं रानांत आलों आहोंत. माझा मुलगा थोड्याच वेळापूर्वीं मोळी विकावयास गावांत गेला आहे. एव्हाना त्यानें मोळी विकून

आलेल्या पैशांतून बाजरी दळून तो भाकरी करीत असेल. भाकरी करून तो त्यावर चटणी कांदा घेऊन रानांत येईल त्यावेळीं तुझी इच्छा असली तर मला त्या मुलाबरोबर पोटभर जेवण करूं दे म्हणजे मग मला तूं खुशाल खा. माझा मुलगा दररोज छान स्वयंपाक करतो. त्याच्या हातचें हें शेवटचें जेवण मला जेवूं देशील तर माझ्यावर तुझें अनंत उपकार होतील' असें म्हणून त्या म्हातारीने वनराजाचें पाय धरलें. म्हातारीचें बोलणें ऐकून सिंहाला, अतिशयच आनंद झाला. तो म्हणाला ठीक आहे. तुझा मुलगा येईपर्यंत मी वाट पहातो.' असें म्हणून सिंह अेका झाडा-आड लपून बसला. इकडे मुलानें मोळी विकून आलेल्या पैशांतून थोडी लसणाची पात विकत घेतली. थोड्या मिरच्या घेतल्या व नंतर बाजरी घेऊन तो घरीं आला. बाजरी दळल्यानंतर त्यानें सुरेख ५–६ भाकरी भाजल्यानंतर चटणी वाटली व ती भाकरी-वर ठेवली आणि खिशांत २–४ कांदे, हातांत पाण्याची कळशी घेऊन तो जंगलाचा रस्ता आक्रमण करूं लागला. थोडा वेळ चाले, पुन्हां बसे अशी त्याची स्थिति होत होती. दोन दिवस पोटांत अन्नाचा कण अजिबात न गेल्यामुळें त्याला बिलकुल चालवत नव्हते. जंगलांत आई पण उपाशी तेव्हां आपण अेक-ट्यानें खात बसण्यापेक्षां आईबरोबरच आपण जेवण करूं या आशेनें तो झोकांड्या जरी खात होता तरी झपाझप पाऊलें टाकण्याकडे त्याचें लक्ष होते. बऱ्याच वेळानें तो जंगलांत येऊन पोहोंचला.

घाईघाईनें त्यानें आपल्या दशम्या सोडल्या आणि ती दोघे मायलेकरें दशम्या खाण्यांस बसणार इतक्यांत अेक गगनभेदी आरोळी त्यांना अैकूं आली आणि त्या पाठोपाठच वनराज अक्राळ

विशाळ स्वरूपात दोघांच्या पुढे दाखल झाले आणि आणि म्हणाले,

बाई लवकर मला प्रथम तुझ्या जेवणाचा हिस्सा खायला घाल. मला अतिशय भूक लागली आहे. बराच वेळ झाला आतां माझ्यानें रहावत नाहीं असें म्हणून तो म्हातारीचा हिस्सा हस्तगत करणार तोंच ... तो मुलगा उठला आणि म्हणाला 'वनराज थांबा हा माझा जेवणाचा हिस्सा घ्या. मी तरुण आहे अजूनहि १ दिवस मी अन्नाशिवाय राहूं शकेन. परंतु माझी आई आज दोन दिवसापासून उपाशी आहे तिच्या पोटांत अन्नाचा कण नाहीं तेंव्हां तिचा हिस्सा तिलाच खाऊं द्या असें म्हणून तो मुलगा उठला व त्यानें आपला हिस्सा मोठ्या आनंदानें त्या सिंहापुढे ठेवला. सिंहानें मोठ्या आनंदानें थोडक्याच वेळांत भाकरीचा फडशा उडविला आणि पाणी पिण्यासाठीं तो शेजारच्याच एका ओढ्याजवळ गेला. पाणी पिणें झाल्यानंतर तो म्हातारीला म्हणाला 'बाई तुझे जेवण आतां झाले आहे तेंव्हा मी आतां तुला खाणार आहे तयार रहा' तो मुलगा सिंहाचे पाय धरून म्हणाला, 'तुम्ही मला खा माझ्या आईला नका खाऊं'.

त्या म्हातारीनें पुष्कळ आढेवेढे घेतले परंतु मुलगा ऐकण्यापूर्वींच सिंहाच्या तोंडात मान देवून म्हणाला, 'आतां खुशाल खा मला'.

आई विषयी मुलाचें प्रेम पाहतांच सिंहाच्या डोळ्यातून जलधारा वाहूं लागल्या आणि तत्क्षणींच वनराजाच्या ठिकाणीं हातांत धनुष्य बाण धारण केलेली प्रभु रामचंद्राची मूर्ति दिसूं लागली.

प्रभु रामचंद्राला पाहतांच त्या दोघां मायलेकरांनी रामचंद्राला साष्टांग लोटांगण घातले. त्या मुलाला उठवीत प्रभु रामचंद्र म्हणाले, 'मुला खरोखरच तुझी मातृभक्ति पाहून मी अतिशय संतुष्ट झालो आहे, तुला जे पाहिजे ते तूं मजजवळ माग मी तुला मोठ्या आनंदाने देईन'.



'परमेश्वरा मला आहे त्याच परिस्थितीत जरी ठेवले तरी चालेल परंतु आईच्या सेवेत मला अंतर पडूं नये आणि आपले दर्शन मला रोज व्हावे. फक्त एव्हढीच माझी अिच्छा आहे'.

'मुला तुझ्या मागण्यावर मी अत्यंत संतुष्ट झालो आहे तुझी, मातृभक्ती तर सदैव चालूं राहून तूं लवकरच एका राज्याचा अधिपती होशील आणि थोडक्यांच काळांत तूं पृथ्वीवरचा एक गुणवान, पराक्रमी, मातृभक्त राजा म्हणून गणला

जाशील. 'देवाचे हे भाषण ऐकतां क्षणींच त्या दोघां मातां लेकरानें ईश्वराचे पाय धरले.

तथास्तु असें म्हटल्यानंतर त्या दोघांना कृपा आशीर्वाद देऊन प्रभु रामचंद्र अन्तर्धान पावले.

□ □

# हृदयाची श्रीमंती

फार वर्षापूर्वींची ही एक गोष्ट आहे. त्यावेळीं चंद्रराज नांवाचा एक अत्यंत हुषार, कर्तव्यतत्पर आणि न्यायप्रिय राजा अवंतिका नगरांत प्रजेसह सुखानें राज्य करीत होता.

आसपासच्या सर्व नगरानगरांतून चंद्रराजाच्या गुणांचीं आणि न्यायीपणाची स्तुति होत असतांनादेखील चंद्रराजा मात्र सदैव कष्टीमुद्रा धारण करूनच आलेल्या आदित्यनारायणाला मानाचा मुजरा करीत असे.

अपार वैभव, अगणित संपत्ति, नोकरचाकर यांचा आपल्यामागें उपभोग घेण्याला आणि प्रजेची सेवा करण्याला आपल्याला एकहि पुत्र व कन्या असूं नये ह्या एकाच कारणामुळें राजाला अन्न तर गोड लागत नसे, शिवाय झोपहि शांतपणें येत नसे, ह्या

एकाच धास्तीमुळें राजाची तब्येत दिवसें दिवस अशक्त होत जाऊं लागली.

एके दिवशीं राजा आपल्या मऊ मऊ गादीवर झोपला असतांना पितांबर धारण केलेला छातीवर हिऱ्यामाणकांचे दागिने रूळत असलेला असा एक तेज:पून्ज कांतीचा देवदूत मध्यरात्रींच्या शांतसमयाला राजाच्या स्वप्नांत आला आणि म्हणाला.

"हे चंद्रराजा, तुला सुलक्षणी असा गुणी मुलगा हवा ना" राजाने हात जोडलें आणि अत्यंत नम्रतेनें तो म्हणाला,

"होय महाराज"

"मी सांगतो त्याप्रमाणें जर वागलास तर सुलक्षणी, दिर्घायुषी असा तेज:पुन्ज कांतीचा मुलगा तुला प्राप्त होईल.

ह्या मुलाला प्राप्त करण्यासाठीं तुला तूर्त कांहीं दिवस राज्यत्याग करून बैराग्याच्या वेषांत आनंदपूर नगरांत जावे लागेल. तेथें तुला भिक्षा मागावी लागेल. जी मुलगी तुला मोठ्या आनंदानें भिक्षा घालील अशा मुलीचीच तूं प्रथम निवड कर इतकेच नव्हे तर या नंतर तुझ्या मनाला वाटेल त्याप्रमाणें त्या मुलीची परीक्षा पाहून तिला मोठ्या सन्मानानें आपल्या नगरांत घेऊन ये म्हणजे मी स्वत: ह्या ठिकाणीं येऊन तुम्हां दोघाचें मोठ्या आनंदानें लग्न लावून देईन" असे म्हणून तो देवदूत एका एकी अदृश्य झाला.

सकाळीं राजा उठला आणि त्यानें घडलेला सर्व वृत्तांत आपल्या परम्प्रिय, सच्छील, सद्गुणी अशा दुर्गाराणीला सांगि-

तला. दुर्गाराणीला अतिशय आनंद झाला. आपल्याला प्रजेची सेवा जास्तीतजास्त करण्याची संधी मिळणार, हा एकच आनंद तिला झाला. आणि प्रजेच्या सुखासाठीं त्याचप्रमाणें वंशवेल वाढण्यासाठीं दुर्गादेवीनें मोठ्या आनंदानें चंद्रराजाला दुसरा विवाह करण्याची परवानगी दिली. स्वत: राज्याची सर्व जबाबदारी दुर्गाराणीनें आपल्या शिरावर घेतली आणि एका सुमुहूर्तावर चंद्रराजाला तिनें सद्गुणी शीलवती, दयावती इत्यादि गुणांनी युक्त अशा मुलीचा शोध करण्यासाठीं मोठ्या आनंदानें निरोप दिला.

रात्रभर चालून चालून सरतेशेवटी चंद्रराजा एका नगराजवळ येतांच त्यानें आपले कपडे बदलले आणि बैराग्याचा वेष परिधान करून तो एका सूर्योदयाला नगरांत येऊन दाखल झाला.

या वैभवपूर्ण अशा नगरांत राजा चंद्रराज दाखल झाला तेव्हा त्याला अतिशयच आनंद वाटला. बराच वेळ नगराची शोभा पहात पहात राजा एका श्रीमन्ताच्या घरासमोर उभा राहिला व त्यानें झोळीतला शंख काढून फुंकण्यास सुरवात केली बराच वेळ शंख फुकल्यानंतर एका स्त्रीने जवळ जवळ मातीतच जमा होणारे पीठ बेचाळीस पिढ्याचा उद्धार करीतच चंद्रराजाच्या झोळीत टाकले व जोराने घराचें दार आपटून जळजळीत नेत्रांनीं पाहून त्या स्त्रीनें चंद्रराजाचा निरोप घेतला.

येथून भिक्षा घेतल्यानंतर चंद्रराजाने एका श्रीमंत सराफाच्या वाड्यासमोर जाऊन शंख फुंकण्यास सुरवात केली.

"भिक्षां देहि, भिक्षां देहि" असें ओरडत असतानाच त्याचें लक्ष सज्जांत आपल्याकडे पाहून हंसणाऱ्या मुलीकडे जातांच

त्याने त्या घराला आपली पाठ दाखविली आणि जास्त वेळ न थांबता तो नगराच्या बाहेर पडला.

नगराबाहेर असणाऱ्या एका माळयाकडून फळें खरेदी करून त्याने एका विशाल वट वृक्षाखाली फराळपाणी केला. दुपार-पर्यंत झोप घेऊन तो पुन्हां सायंकाळच्या समयाला नगरांत आला आणि वाड्या वाड्यांतून, प्रासादा प्रासादांतून त्यानें "भिक्षां देहि" ला सुरूवात केली परन्तु भिक्षा मिळण्याऐवजीं कटु शब्दांची मुक्ताफळेंच त्याच्या झोळींत गर्दी करूं लागली.

असा अनुभव बरेच दिवस झाल्यानंतर त्यानें झोपड्यां झोपड्यांतून "भिक्षां देहि" म्हणण्यास सुरवात केली परन्तु तेथेंहि चंद्रराजाची निराशा झाली. १–२ वर्षापेक्षांहि जास्त काल घालवून हवी तशी भिक्षा आणि भिक्षा घालणारी मुलगी त्याला दिसेना व त्या बरोबरच आपला उद्देश सफल होण्याचेहि चिन्ह दिसेना ह्या एकाच विचारानें तो दिवसेनदिवस जास्तच कष्टी होऊ लागला. याहि परिस्थितीत ५–६ महिने गेले.

एके दिवशीं संध्याकाळीं निराश होऊन चंद्रराजा कष्टी मुद्रेने एका चंद्रमौळी झोपडीसमोर आला आणि त्यानें झोळीतला शंख काढून फुंकण्यास सुरवात केली; असेल नसेल तोच...

एक १७–१८ वर्षांची लावण्यवती आपलें दैन्य शक्यतो लपविण्याचा प्रयत्न करीत हंसऱ्या मुद्रेनें बाहेर आली. तिनें मोठ्या आनंदाने बैराग्याच्या वेषांत असणाऱ्या चंद्रराजाला सप्रेम अभिवादन करून चंद्रराजाच्या हाताला हात देऊन ती म्हणू लागली.

"महाराज असें आपण बाहेर उभे कां ? आंत या माझ्या बरोबर ! आणि आपल्या पदरजकानें माझी चंद्रमोळीं झोपडी

पावन करा" असे म्हणून त्या लावण्यवती तरूणीनें मोठ्या प्रेमाने चंद्रराजाला आपल्या झोपडीत नेले.

पाय धुण्यास गरम पाणी दिलें. आणि ती म्हणू लागली.

"महाराज मी मोलमजुरी करते आणि पोट भरते परंतु गरीब भिक्षेकरी पहिला कीं मला भडभडून येते श्रीमंतानीं केलेल्या विषमतेची मला चीड येते पण मी अबला करणार तरी काय ? गरीब माणसांना देण्यासाठी मजजवळ होता तेवढा सर्व पैसा मी खर्च केला म्हणूनच मला अशी स्थिती प्राप्त झाली पण त्यांत मला आनंद आहे. त्रिभुवनाचें राज्य देखील मला ह्या आनंदापुढें तुच्छ आहे. तुम्हांला देण्यासाठी आतां मजजवळ पैसा ... अडका कांहीं कांहीं म्हणून नाहीं परंतु शेळीच्या दुधांत सकाळी कुस्करून ठेवलेली शिळी भाकरी आपण खा माठांतलें थंडगार पाणी पिऊन आपण संतोषाने ढेकर द्या त्यांतच माझे त्रिभुवनाचें सुख सांठविलेले आहे." असें म्हणून तिनं एका फुटक्या परन्तु स्वच्छ अशा ताटात राजाला भाकरीचा कुस्करा वाढला व शेजारी थंडपाण्यानें भरलेले असे एक मडके ठेवून तिनें चंद्रराजाला अन्नाचा स्विकार करावा अशी विनंति केली.

चंद्रराजाला तो कुस्करा तिच्या अमृततुल्य वाणीइतकाच गोड वाटला. मोठ्या प्रेमानें त्याने तिनें दिलेला कुस्करा खाल्ला आणि तितक्याच संतोषानें मडक्यातील पाणी पिऊन त्यानें तिचा निरोप घेतला.

दूसऱ्या दिवशीं चंद्रराजा तिच्या झोपडीसमोर अुभा राहिला आणि त्यानें दमयन्तीदेवी म्हणून हाक मारण्यास सुरवात करताच कालच्या पेक्षांहि जास्त आनंदानें तिनें चंद्रराजाचें

स्वागत केलें परंतु बैरागी तापानें फणफणलेला आहे असें पाहतांच दमयंतीच्या काळजांत चर्रर झाले. चंद्रराजाला झोपडीत नेलें. एका फाटक्या सतरंजीवर झोपवून राजाचें हातपाय चेपण्यास व राजाला आराम पडण्यासाठीं वनस्पतीचे काढे देण्यास सुरवात केली.

दमयन्तीच्या चंद्रमौळी झोपडींत बरेंच दिवस राहून देखील दमयंतीनें किंचितहि नापसंती न दर्शविता चंद्रराजाची मनोभावे सेवा केली.

दमयंतीची सेवा पाहून राजा चंद्रराज अतिशय खूष झाला आणि त्यानें हीच मुलगी आपणासाठीं योग्य आहे असे मनाशीं ठरवून थोडक्याच दिवसांत तो पूर्ण बरा झाल्यानंतर आपल्या नगरीत आला. घडलेली सर्व हकीगत त्यानें दुर्गाराणीला आणि आपल्या प्रजेला मोठ्या आनंदानें सांगितली सर्वांना आनंद झाला. एके दिवशीं राज-ज्योतिषानें काढून दिलेल्या सुमुहूर्तावर चंद्रराजाने दमयंती राणीला वाजत गाजत आपल्या नगरांत आणले.

पुढें लवकरच दमयंतीचें लग्न चंद्रराजा बरोबर देवदूतानें लावून दिले.

पुढें एक दोन वर्षांच्या कालावधींतच दमयंतीनें सद्गुणी, सच्छिल, न्यायी अशा मुलाला जन्म दिला.

पुढें ह्याच मुलानें आपल्या आईबापांना जास्तीत जास्त सुख देऊन प्रजेला आपल्या मुलाप्रमाणें वागवून आपल्या राज्याची भरभराट केली.

□ □

# राजकुमार वदनचन्द्र

फार प्राचीन काळाची ही गोष्ट आहे. एका माणिक नगरांत एक राजा राहात होता. त्याला "वदनचंद्र" नांवाचा एक सुशील देखणा, असा पराक्रमी मुलगा होता.

आटपाट नगरांतून एके दिवशीं सायंकाळीं स्वच्छंदपणें फिरत असतां नगराच्या अगदीं कडेला एका झोपडींत राहत असलेल्या विद्वान तपस्व्याकडे वदनचंद्राची दृष्टि गेली, जाता जाता त्याचें कुशल जाणून घ्यावें, ह्या दृष्टीनें तो त्या तपस्व्याच्या झोपडींत शिरला.

त्यावेळीं तो तपस्वी आपल्या, नाग. उंदीर आणि पोपट यांच्यासमवेत आनंदानें खेळ खेळत होता. हा अद्भूत असा प्रकार पाहून वदनचंद्र आश्चर्यानें थक्क झाला. तिघा प्राण्यांची परस्परांवर असलेली प्रीति बघून त्याला अतिशयच आश्चर्य वाटलें. ते तिघेंहि आपलें वैर विसरून, त्या तपस्व्याजवळ गुण्या-गोविंदानें राहत होते. बराच वेळ तो ह्या तिघा प्राण्यांचा खेळ पाहण्यात गर्क झाला होता. इतक्यात त्या तपस्वी महाराजांची नजर वदनचंद्राकडे वळली. राजपुत्राला बघताच तो तपस्वी घाईघाईनें उठला. मोठ्या आनंदानें त्यानें त्याला बसावयास

प्राण्यांची कीर्ति हळूहळू आजुबाजूच्या नगरांत पसरूं लागली. पसरतां पसरतां ती भैरवगडाच्या राजाच्या कानावरहि गेली असे हे तीन प्राणी आपल्या राजधानींत असावे, असे त्याला वाटूं लागलें. त्याने आपल्या शिपायामार्फत वदनचंद्राला आपल्या दरबारांत बोलाविलें. आपला 'कट्टर शत्रू' हा आपणाला आज मानाने बोलावित आहे, त्या अर्थी यांत नक्की कांहीं तरी काळे-बेरें असलें पाहिजे, असा मनाशीं विचार करून, जाण्यापूर्वी वदनचंद्राने आपल्या ह्या मित्रांना एकंदरपरिस्थितीची कल्पना एकान्तात देऊन तो शिपायांसह दरबारात हजर झाला.

राजाने त्याला वाटेल ती किंमत देऊन ते तीन प्राणी मला द्यावेत, अशी विनंती केली. त्याची ही विनंति वदनचंद्राने धूडकावून लावली. तेव्हा राजाने त्याला तुझ्या नगरावर स्वारी करील आणि तुला कैदेत ठेवीन ? असाहि दम दिला. परंतु कोणत्याहि सबबीवर त्याने आपले तीन मित्र राजा दुष्यनसिंगाला देण्याचें साफ नाकारलें. तेंव्हा राजा दुष्यन सिंगाला अतिशय राग आला. त्याने रागाच्या भरांत वदनचंद्राला कैदेंत टाकलें आजि त्या खोलीची चावी आपल्या खिशांत घालून तो दाणदाण पावलें आपटीत निघून गेला.

बराच वेळ झाला. संध्याकाळ होत आली तरी कबूल केल्याप्रमाणें आपला वदनचंद्र आपणांस भेटावयास कसा आला नाहीं. याची त्याच्या तिघा मित्रांना काळजी वाटूं लागली. खात्रीने कांही तरी दगाफटका झाला असावा, असा विचार करून पोपटानें, उंदराने आणि नागाने आपल्या मित्राला सोडविलेंच पाहिजे, असा मनाशीं चंग बांधला. लगेच साप आणि उंदीर

पोपटाच्या पाठीवर बसले आणि पोपटाने तत्क्षणींच पंख हालविण्यास सुरुवात केली.

थोडा वेळ थांबत थांबत ते तिघें जण राजा दुष्यनसिंगाच्या राजधानींत येऊन पोहोंचले. नागाला आणि उंदराला एका ठिकाणीं ठेवून पोपट वदनचंद्राला भेटण्यासाठीं तुरुंगाच्या दिशेनें भटकूं लागला.

मध्यरात्रींपूर्वी तो पोपट उडता उडता वदनचंद्राच्या कैदखान्यासमोर आला. वदनचंद्र जागाच होता. पोपटाला आलेला पाहतांच वदनचंद्राला अतिशय आनंद झाला. वदनचंद्राशीं बोलणें झाल्यानंतर पोपट पुन्हां माघारी परतला आणि उंदराला घेऊन थोडक्याच वेळांत कैदखान्याजवळ आला.

मध्यरात्रींची वेळ होती. पहारेकरी पेंगत होते. असें बघतांच पोपटाने उंदराला राजाच्या खिशांतून किल्ली आणण्यास सांगितलें. उंदीर शोधत शोधत राजाच्या शयनगृहांत गेला आणि राजाचा खिसा कुरतडून त्यानें किल्ली तोंडांत धरली आणि अल्पावकाशांतच तो पोपटाकडे आला. पोपटाला अतिशय आनंद झाला. पोपटाने किल्ली चोंचींत धरून ती वदनचंद्राकडे टाकली वदनचंद्राने झट्दिशीं दार उघडलें आणि तो आपल्या ह्या दोन प्राण्यांना घेऊन तेथून निघाला. जातां जातां अश्वशाळेंतील एक सुंदरसा घोडा पण त्यानें पळवला.

आपल्या नगराकडे न जाता एका दूर दूर असणाऱ्या कांचन नगराकडे त्यानें आपला घोडा वळविला, दुसऱ्या दिवशीं तो आपल्या मित्रांसह त्या नगरांत पोहोंचला असेल नसेल तोंच . . .

# राजकुमार वदनचन्द्र

फार प्राचीन काळाची ही गोष्ट आहे. एका माणिक नगरांत एक राजा राहात होता. त्याला "वदनचंद्र" नांवाचा एक सुशील देखणा, असा पराक्रमी मुलगा होता.

आटपाट नगरांतून एके दिवशीं सायंकाळीं स्वच्छंदपणें फिरत असतां नगराच्या अगदीं कडेला एका झोपडींत राहत असलेल्या विद्वान तपस्व्याकडे वदनचंद्राची दृष्टि गेली, जाता जाता त्याचें कुशल जाणून घ्यावें, ह्या दृष्टीनें तो त्या तपस्व्याच्या झोपडींत शिरला.

त्यावेळीं तो तपस्वी आपल्या, नाग. उंदीर आणि पोपट यांच्यासमवेत आनंदानें खेळ खेळत होता. हा अद्भूत असा प्रकार पाहून वदनचंद्र आश्चर्यानें थक्क झाला. तिघा प्राण्यांची परस्परांवर असलेली प्रीति बघून त्याला अतिशयच आश्चर्य वाटलें. ते तिघेंहि आपलें वैर विसरून, त्या तपस्व्याजवळ गुण्या-गोविंदानें राहत होते. बराच वेळ तो ह्या तिघा प्राण्यांचा खेळ पाहण्यात गर्क झाला होता. इतक्यात त्या तपस्वी महाराजांची नजर वदनचंद्राकडे वळली. राजपुत्राला बघताच तो तपस्वी घाईघाईनें उठला. मोठ्या आनंदानें त्यानें त्याला बसावयास

'व्याघ्रचर्म' दिलें, खावयास फळफळावळ दिलें.

साधूचें हें आदरातिथ्य बघून वदनचंद्राला साधूबद्दल आत्मीयता वाटूं लागली. साधूच्या मिठ्ठासवाणीनें तो पुरताच भारावला गेला. साधूच्या संगतींत जास्तींत जास्त वेळ मिळावा म्हणून तो या ना त्या निमित्तानें राजवाड्यांतून बाहेर येई आणि साधूकडे जात असे. साधूहि त्याला राज पुराणांतील धीररसानें ओथंवलेल्या कथा सांगून उत्तमोत्तम उपदेशहि करीत असे.

साधूकडे नियमित येण्याजाण्यामुळें ह्या तिन्ही परंतु हुषार अशा मुक्या प्राण्यांशींसुद्धा वदनचंद्राची चांगलीच दोस्ती जमली हें पाहून एके दिवशीं तो साधू वदनचंद्राला म्हणाला.

"बाळा ! वदनचंद्रा ! मी आतां तीर्थयात्रेला जात आहे, तेव्हां माझी ही तीन मुलं तूं आपल्याजवळ ठेव. त्यांना तुझा अतिशय लळा लागला आहे. असें म्हणून साधूनें मोठ्या आनंदानें नाग, उंदीर आणि पोपट या तिघांना वदनचंद्राच्या स्वाधीन केलें.

वदनचंद्राला हे तीन मित्र मिळतांच अतिशय आनंद झाला आपल्या वाड्यांत आल्यानंतर त्यानें प्रत्येकाची उत्तमोत्तम व्यवस्था केली.

नागाला रोज सकाळ-संध्याकाळ ताजें दूध, उंदराला धान्य आणि पोपटाला डाळींब, ओली हरबऱ्याची डाळ, हिरव्या मिरच्या वगैरे मिळण्याची उत्तम सोय झाली. हे सर्व मिळाल्या-नंतर ह्या तिघा प्राण्यांच्या मनांत वदनचंद्राविषयीं कोणतीहि कामगिरी पार पाडण्यासाठीं ह्या तिघाची एकसारखी धडपड चालू असे.

याप्रमाणें पुष्कळच दिवस गेले. वदनचंद्राच्या ह्या मुक्या

प्राण्यांची कीर्ति हळूहळू आजुबाजूच्या नगरांत पसरूं लागली. पसरतां पसरतां ती भैरवगडाच्या राजाच्या कानावरहि गेली असे हे तीन प्राणी आपल्या राजधानींत असावे, असे त्याला वाटूं लागलें. त्याने आपल्या शिपायामार्फत वदनचंद्राला आपल्या दरबारांत बोलाविलें. आपला 'कट्टर शत्रू' हा आपणाला आज मानाने बोलावित आहे, त्या अर्थी यांत नक्की कांहीं तरी काळे-बेरें असलें पाहिजे, असा मनाशीं विचार करून, जाण्यापूर्वी वदनचंद्राने आपल्या ह्या मित्रांना एकंदरपरिस्थितीची कल्पना एकान्तात देऊन तो शिपायांसह दरबारात हजर झाला.

राजाने त्याला वाटेल ती किंमत देऊन ते तीन प्राणी मला द्यावेत, अशी विनंती केली. त्याची ही विनंति वदनचंद्राने धूडकावून लावली. तेव्हा राजाने त्याला तुझ्या नगरावर स्वारी करील आणि तुला कैदेत ठेवीन ? असाहि दम दिला. परंतु कोणत्याहि सबबीवर त्याने आपले तीन मित्र राजा दुष्यनसिंगाला देण्याचें साफ नाकारलें. तेंव्हा राजा दुष्यन सिंगाला अतिशय राग आला. त्याने रागाच्या भरांत वदनचंद्राला कैदेंत टाकलें आजि त्या खोलीची चावी आपल्या खिशांत घालून तो दाणदाण पावलें आपटीत निघून गेला.

बराच वेळ झाला. संध्याकाळ होत आली तरी कबूल केल्याप्रमाणें आपला वदनचंद्र आपणांस भेटावयास कसा आला नाहीं. याची त्याच्या तिघा मित्रांना काळजी वाटूं लागली. खात्रीने कांही तरी दगाफटका झाला असावा, असा विचार करून पोपटानें, उंदराने आणि नागाने आपल्या मित्राला सोडविलेंच पाहिजे, असा मनाशीं चंग बांधला. लगेच साप आणि उंदीर

पोपटाच्या पाठीवर बसले आणि पोपटाने तत्क्षणींच पंख हालविण्यास सुरुवात केली.

थोडा वेळ थांबत थांबत ते तिघें जण राजा दुष्यनसिंगाच्या राजधानींत येऊन पोहोंचले. नागाला आणि उंदराला एका ठिकाणीं ठेवून पोपट वदनचंद्राला भेटण्यासाठीं तुरुंगाच्या दिशेनें भटकूं लागला.

मध्यरात्रींपूर्वी तो पोपट उडता उडता वदनचंद्राच्या कैदखान्यासमोर आला. वदनचंद्र जागाच होता. पोपटाला आलेला पाहतांच वदनचंद्राला अतिशय आनंद झाला. वदनचंद्राशीं बोलणें झाल्यानंतर पोपट पुन्हां माघारी परतला आणि उंदराला घेऊन थोडक्याच वेळांत कैदखान्याजवळ आला.

मध्यरात्रींची वेळ होती. पहारेकरी पेंगत होते. असें बघतांच पोपटाने उंदराला राजाच्या खिशांतून किल्ली आणण्यास सांगितलें. उंदीर शोधत शोधत राजाच्या शयनगृहांत गेला आणि राजाचा खिसा कुरतडून त्यानें किल्ली तोंडांत धरली आणि अल्पावकाशांतच तो पोपटाकडे आला. पोपटाला अतिशय आनंद झाला. पोपटाने किल्ली चोंचींत धरून ती वदनचंद्राकडे टाकली वदनचंद्राने झट्दिशीं दार उघडलें आणि तो आपल्या ह्या दोन प्राण्यांना घेऊन तेथून निघाला. जातां जातां अश्वशाळेंतील एक सुंदरसा घोडा पण त्यानें पळवला.

आपल्या नगराकडे न जाता एका दूर दूर असणाऱ्या कांचन नगराकडे त्यानें आपला घोडा वळविला, दुसऱ्या दिवशीं तो आपल्या मित्रांसह त्या नगरांत पोहोंचला असेल नसेल तोंच . . .

त्याच्या कानावर राजाची दवंडी ऐकूं आली कीं, जो कोणी आज मध्यरात्रींपर्यंत माझ्या एकुलत्या एक मुलीचें प्राण वांचवील त्याला माझें राज्य "सप्रेम भेट" म्हणून मिळेल इतकेंच नव्हें तर स्मितवदनाचें लग्नहि त्याच्या बरोबर लावण्यांत येईल.

हें ऐकतांच वदनचंद्र राजाकडे गेला आणि काय झालें याचा खुलासा विचारला, राजानें त्याचा यथायोग्य सत्कार करून त्यास सांगितलें कीं,

"काल रात्रींच हिला नाग–दंश झाला. नागाचें विष काढण्याचा आम्ही पुष्कळ प्रयत्न केला पण व्यर्थ ! नागाचें विष काढले तर माझी कन्या बरी होईल, असें राजवैद्यांनीं सांगितलें. तेव्हां आपण कसेंहि करून माझ्या कन्येला प्राणदान द्या.

राजाचें हें बोलणें ऐकल्यानंतर वदनचंद्र आपल्या मित्रासह राजकन्येच्या महालांत गेला आणि दार बंद केले.

महालांत सुस्वरुप राजकन्या निचेष्ट पडली होती. वदन-चंद्राने हळूंच आपल्या पडशींतला नाग बाहेर काढला आणि तोंडासमोर काहींतरी पुटपुटून त्यानें तो नाग सोडला. नागाने तिच्या अंगातील सर्व विष काढून घेतलें.

बराच वेळ झाल्यानंतर राज-कन्या हालचाल करूं लागलेली पाहतांच वदनचंद्राला अतिशय आनंद झाला. त्याने राजाला निरोप पाठविला.

इतकें होई पर्यन्त राजकन्या स्मितवदना चांगलीच शुद्धीवर आली होती.

आपली राजकन्या शुद्धीवर आलेली बघतांच राजाला अतिशय आनंद झाला. वदनचंद्रानें एकंदर घडलेली सर्व हकीगत

राजाला सांगितली. तेव्हां राजाचा आनंद तर गगनांत मावेनासा झाला त्यानें मोठ्या आनंदानें स्मितवदनाचे लग्न वदनचंद्राबरोबर लावून दिलें आणि आपल्या शिरावरील राज्याची धूरा वदनचंद्राच्या स्वाधीन केली.

इकडे काय झालें. वदनचंद्र तुरूंगांतून पळून गेलेला पाहतांच भैरवगडच्या राजानें संतापानें चिडून जाऊन बेसावध असणाऱ्या माणिक नगरावर स्वारी केली. आणि वदनचंद्राच्या आई-वडिलांना कैदेत टाकलें.

ही बातमी वदनचंद्राला कळतांच, त्यानें आपल्या सासऱ्याच्या अनुमतीनें भैरवगडावर स्वारी केली, आणि भैरवगडच्या राजाचा पुरता नायनाट करून कैदेंतून आपल्या मातापित्यांची सुटका केली.

पुढें लवकर भैरवगड, माणिक, कांचननगरहि तिन्हीं राज्यें एकत्र करून सर्व प्रजाजनांच्या आज्ञेनुसार वदनचंद्रानें स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. त्यावेळीं वदनचंद्राच्या तीन मुख्या मित्रांची व्यवस्था तर एखाद्या एकुलत्या एक राजपुत्राप्रमाणें होती.

अशा रीतीने वदनचंद्र आपल्या मित्रासह मोठ्या आनंदाने राहू लागला.

□ □

# कर्तबगार राजपुत्र

**फा**रच वर्षापूर्वीची ही एक गोष्ट आहे. त्या वेळी चैतन्य नगरांत चैतन्यराज नांवाचा एक सार्वभौम राजा राज्य करीत होता.

त्या राजाला देवराज, चंद्रराज आणि इंद्रराज या नांवाचे तीन पुत्र होते. ह्या तिघांहि भावांचें परस्परांवर राम-लक्ष्मण आणि भरत यांच्याप्रमाणें प्रेम होतें.

तिघांपैकीं एकाहि भावाला आपला भाऊ दृष्टीआड झाल्यास चैन पडत नसे. शरीरें वेगळी पण मन मात्र अगदीं एक, असेंच त्या तिघां भावांबद्दल बोलतां येण्यासारखें होतें.

राजानें राजघराण्याला आवश्यक असणाऱ्या सर्व शस्त्रास्त्रांचें, कलांचें व गुणांचें शिक्षण आपल्या मुलांना त्या त्या विषयांत तज्ज्ञ असणाऱ्या गुरुकडून आपल्या देखरेखीखालीं दिलेलें असल्यामुळें ते तिघेहि राजपुत्र सर्व शास्त्रांत आणि कलागुणांत सूर्यासारखें तळपत होते.

एके दिवशीं राजाच्या मनांत विचार आला कीं ह्या तिघां राजपुत्रांची स्वत:ची कर्तबगारी काय आहे ती पाहावी आणि

जो मुलगा आपल्या परीक्षेंत यशस्वी रीतीनें उत्तीर्ण होईल, अशाच मुलाच्या शिरावर राज्यकारभाराचें ओझें देऊन आपण आपला काळ ईशचिंतनांत घालवावा.

झालें ! राजाची अिच्छा ! मग तिला कोण अडविणार ? अेक दोन दिवस झाले असतील नसतील तोंच . . .

राजानें सकाळच्या प्रशान्त समयीं आपल्या मुख्य मंत्र्या-कडून आपल्या तिघां मुलांना खास महालांत बोलावून घेतले.

सर्वांचा अल्पोपहार झाल्यानंतर राजानें देवराजला विचारलें,

'बाळ देवराजा ! तूं कोणाच्या नशिबानें खातोस ? कशाच्या जोरावर तूं राज्य चालवशील '

बाबा मी तुमच्याच नशिबानें खाणार आणि तुमच्याच सल्ल्यानुसार राज्य चालविणार. मला तुमच्याशिवाय कोणाचा बरें आधार आहे ? तुम्ही आधार न द्याल तर हें राज्य खात्रीनें शत्रुच्या स्वाधीन होणार !' देवराजनें शांतपणें उत्तर दिलें.

हाच प्रश्न त्यानें चंद्रराजला विचारला. देवराजप्रमाणेंच चंद्रराजनेंहि शांतपणें उत्तर दिलें.

राजा मनांतून अतिशय निराश झाला. सरतेशेवटीं हाच प्रश्न त्यानें इंद्रराजला विचारला. त्यानें ताडकन उत्तर दिलें.

'बाबा ! मी माझ्याच नशिबानें आजवर खात आलों असून इथून पुढें खाणार ! कोणाचा मिंधा न राहतां स्वतःच्या मनगटावर राज्य चालविण्याची धमक माझ्या अंगीं ईशकृपेनें आहे फक्त थोरामोठ्यांचीं आशिर्वादरुपी ढाल सदैव माझ्या पाठीशीं असली म्हणजे झाले.'

इंद्रराजाचें हे उत्तर अैकतांच राजदरबारांतील सर्व मंत्र्यांनीं इंद्रराजाच्या नांवानें जयघोष केला. राजालाहि अतिशय आनंद झाला. आनंद झाला नाहीं तो देवराज आणि चंद्रराज या दोघा भावांना. इंद्रराजाचे हे उद्गार अैकतांच त्या दोघां भावांना अतिशय वाईट वाटले, कारण आता बाबा नक्की इंद्रराजला नगरीबाहेर घालविणार, त्याला त्रास होणार, कष्ट पडणार ! एकदम असें बोलण्यानें महाराज खात्रीनें रागें भरणार कारण त्यांचा स्वाभिमान इंद्रराजनें दुखविला. त्या दोघा भावांनीं इंद्रराजची पुष्कळ समजूत घातली पण व्यर्थ.

कोणाचे कांहीं असो परंतु इंद्रराजचें हें बाणेदार उत्तर ऐकताच चैतन्य राजाला अतिशय परमावधीचा आनंद झाला. पण तो आनंद मनांतच ठेवून राजा वरकरणी रागानें लाल झाल्याचा अभिनय करीत संतापून म्हणाला.

'मूर्खा ! धिक्कार असो तुझा. माझेंच खातोस आणि शिवाय माझ्याच घराचे वासे मोजतोस ? तुझ्या नशीबाचा आणि मनगटाचा तुला अभिमान असेल तर कांहीं तरी कर्तबगारी गाजवून दाखव आणि मगच तुझें तोंड दाखव, त्याशिवाय तुझें तोंड तू मला दाखविलेस तर तो माझा अधःपात म्हणून समजेन, चल चालता हो इथून.'

चैतन्य राजाचें हें बोलणें ऐकतांच दरबारांतील अितकेंच नव्हे तर घरांतील सर्वांनी त्याची समजूत घातली. पण व्यर्थ ! आपल्या ह्या राजहट्टापासून राजा क्षणभरहि दूर झाला नाही.

इंद्रराज अतिशय शूर आणि शान्त स्वभावाचा होता. बापाचें अेवढें बोलणें अैकूनहि त्यानें प्रत्युत्तर न करता बापाचा

आशिर्वाद घेतला. कोणत्याहि आणीबाणीच्या प्रसंगीं आपला धीर सोडून गर्भगळित होणाऱ्या राजपुत्रांपैकीं तो राजपुत्र नव्हता. तो ज्ञानानें गणपती होता. मनानें कर्ण होता. शौर्यानें अर्जुन असूंन शरीरानें भीम होता. युक्तीनें कृष्ण होता आणि रुपानें मदनासारखा असून नीतीनें धर्म होता. म्हणूनच . . .

स्वत:च्या नशिबावर आणि मनगटावर त्याचा विश्वास होता. या दोन गोष्टींवर आपण आपलें नांव अितकेंच नव्हे तर स्वघराण्याचें आणि कुलाचेंहि नांव त्रिखंडात अमर करूं अशी त्याचीं महत्वाकांक्षा होती.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच आपल्या बालपणापासून सोबत करीत असलेल्या पंचकल्याणी घोड्यावरच स्वार होऊन आणि कमरेला तलवार लटकावून त्यानें प्रसन्नचित्तानें चैतन्यनगरीचा निरोप घेतला.

मजल दर मजल करीत दऱ्या डोंगर पार करीत कधी उपाशी कधी अर्धपोटीं राहून आलेल्या संकटांना तोंड देत राजपुत्र इंद्रराज थोडक्यांच दिवसांत 'माणिक नगरांत' येऊन पोंहचला.

दुसऱ्या दिवशी त्या नगराचा राजा 'सूर्यभानसिंग' यांस भेटून आपण कृपाळू होऊन मला आपली सेवा करण्याची संधी द्या' असें म्हणून प्रेमळपणानें हात जोडले.

माणिक नगराच्या राजानें इंद्र राजाच्या भरदार शरीराकडे पाहून मोठ्या आनंदाने त्याला आपल्या लष्करांत तात्पुरती सैनिकाची नौकरी दिलीं.

नौकरी मिळतांच इंद्रराजाला अतिशय आनंद झाला. थोडक्याच काळांत आपल्या मनगटाच्या जोरावर या इंद्रराजानें आपलें शौर्य दाखविण्याचा पराक्रम सुरूं केला आणि थोडक्याच वर्षाच्या कालावधींत सर्वाची मर्जी संभाळून इंद्रराज शिपायाच्या जागेवरून चढत्या क्रमाने अधिकारग्रहण करीत करीत सर्व सैन्याचा मुख्य सेनापति झाला. पुढें पुढें सूर्यभानसिंगानें इंद्र राजाच्या ठिकाणीं असणारे राजकारणकुशल गुण पाहून आपला मुख्य प्रधान नेमले आणि वार्धक्यामुळें पेलवावयास कठीण जात असलेली राज्यधुरा सर्वांच्या मतानुसार शूर अशा इंद्रराजाच्या खांद्यावर दिली.

सर्वांना अतिशय आनंद झाला. दिपोत्सव साजरा करण्यांत येऊन आनंदोत्सवानिमित्त हत्तीवरून साखर व दाणे वाटण्यांत आलें.

अशा आनंदोत्सवांत सारे माणिक नगर असतांनाच माणिक नगराच्या उज्ज्वल भवितव्याचा नायनाट करूं बघणाऱ्या चंद्रापूर नगराच्यां भिमसिंग राजाने आपल्या जासूदाच्या सांगण्यावरून लगेच स्वारी केली.

जिकडे तिकडे धांवपळ आरडाओरड सुरूं झाली. जीव वांचविण्याच्या गडबडींत प्रत्येक जण सापडेल त्या मार्गानें आपलें घर गांठण्याचा प्रयत्न करूं लागला.

थोडक्यांच अवधींत माणिक नगर तलवारीच्या खणखणा-टांनीं, अश्वाच्या टापांनीं, हत्तींच्या कर्णकटु चित्कारांनीं गज-बजून गेलें.

माणिक नगरांत इतका वेळ असणारी विलासवृत्ति भंग पावून सगळीकडे सैतानी नाच सुरूं झाला कीं काय असा भास प्रत्येकाला होऊ लागला.

मुख्य प्रधान इंद्रराजहि स्वपराक्रमाची शिकस्त करुन आपल्या सैन्यासह शत्रुपक्षाच्या सैन्याला तोंड देत होता. माणिक-पूरच्या बेसावध असणाऱ्या सैन्याला आपण थोडक्या अवकाशांतच गारद करूं ही आशा जेव्हां फोल ठरली. त्या वेळीं मात्र चंद्रापूर नगराच्या सैन्यानी शस्त्रास्त्र तेथेंच टाकून जीव घेऊन पळण्यास सुरूंवात केली. परंतु जातांना राजाची एकुलती एक कन्या 'इंद्रकांता' हिला अटक करून आपल्या बरोबर नेण्यास भिमसिंग मात्र विसरला नाही.

युद्धाचें वातावरण शांत झालें. पण राजा सूर्यभानसिंगाची काळजी मात्र दिवसेंदिवस वाढूं लागली. एकुलत्या एक कन्येच्या ध्यासानें राजाला जेवणखाण सुचेनासे झालें.

"आतां काय करावे" ह्या एकाच प्रश्नानें माणिकपुरा-मधील सर्व लोकांच्या मनांत घर केलें.

अशा अवस्थेंत पुष्कळ दिवस गेल्यानंतर एके दिवशीं मध्यरात्रीच्या एकदोन घटका अगोदर इंद्रराजानें आपल्या निवडक अशा पराक्रमी स्वारानिशी चंद्रापूर नगरावर स्वारी केली इकडे तिकडें प्रथम न जातां त्यांनीं आपला मोर्चा राज-वाड्याकडे नेला.

कार्यांत खो घालणाऱ्या प्रत्येक शत्रुपक्षाच्या लोकांना कंठस्नान घालून राजाला कैद केलें. कांहींना कारावासांत टाकून, तर कांहींना माफीचे साक्षीदार करून गोरगरीबांची सुटका केली.

सूर्योदयाच्या पूर्वीच आपलें निशाण चंद्रपुरच्या दुर्गावर लावून इंद्रराज इंद्रकांतासह आपल्या राज्याकडे परतला.

घडलेली हकीगत ऐकतांच सूर्यभानसिंग राजाला अतिशय आनंद झाला. त्यानें मोठ्या आनंदानें इंद्रकांताचा हात इंद्रराजच्या हातांत दिला. इतकेंच नव्हे तर चंद्रापुरचे राज्यहि माणिक-पुराला जोडून त्याचा कारभार इंद्रराजवर सर्वानुमतें सोंपविला. इतकें सर्व झाल्यानंतर एके दिवशीं जासूदानें निरोप आणला कीं चैतन्य नगरावर संग्रामसिंगाची स्वारी लवकरच होणार आहे.

वातमी कळतांच इंद्रराज आपल्या सैन्यासह चैतन्यनगराच्या दिशेनें चाल करून गेला. अर्ध्या वाटेवर असणाऱ्या संग्रामसिंगाचा पराभव करून त्याला पिटाळून लावले आणि आपल्या राज्याची त्या बरोबरच आपल्या परमपूज्य अशा वडिलांची व भावांची अेका मोठ्या अग्निदिव्यांतून सुटका केली.

सूर्यभानुसिंगानें घडलेली सर्व हकीगत आपल्या परमस्नेही चैतन्य राजाला सांगतांच दोघांनाही अतिशय आनंद झाला. त्यानें मोठ्या प्रेमानें आपल्या लाडक्या अशा राजाला–इंद्रराजाला हृदयाशीं कवटाळून त्याच्या मुखावर आनंदाश्रूंचा अभिषेक केला. त्या वेळीं चैतन्य राजाच्या मुखांतून पुढील शब्द बाहेर पडले.

"खरोखर इंद्रराजा तू आपल्या मनगटाच्या जोरावर स्वतःच राजा झालास आणि भावांनाहि राज्यपदप्राप्त करून दिलेस.

□ □

# आज्ञाधारक नोकर !

खूप खूप वर्षापूर्वीची गोष्ट. एक मोठं नगर होतं. त्या नगरांत चंदनमल नावांचा एक व्यापारी राहत होता.

चंदनमल नगरांतील खूप मोठा व्यापारी होता. त्याचा व्यापारही चांगला चालला होता. त्यामुळें त्यांना नौकर-चाकरही खूप होते.

व्यापारांत हुषार असणारे चंदनमल बाकीच्या व्यवहारांत थोडेसे अर्धवट होते. त्यांच्या अर्धवटपणामुळें चंदनमल खूप वेळा गोत्यांत येत असत. आणि त्याचा परिणाम चंदनमलची खूप फजिती होण्यांत होई.

एकदां काय झालं चंदनमलच्या मनांत आलं कीं, आपण तीर्थयात्रेला जावें. बरोबर आपली बायको आणि इनामी व आज्ञाधारक नोकर भोलाराम यांना बरोबर घ्यावं,

यात्रेला जाण्याचा चंदनमलचा निश्चय झाला तेव्हां त्यानें यात्रेची तयारी करण्यास सुरुवात केली. पेढीवरच्या मुनिमजींना, नोकरांना त्याचप्रमाणें घरांतील लेकी, सुनांनाही त्यानें योग्य त्या सूचना दिल्या. घर खर्चासाठीं द्रव्यही त्यानें मुलांच्या स्वाधीन केले, कांहीं द्रव्य स्वतःसाठीं घेतलें, आणि सर्व तयारी

झाली असे पाहून यात्रेला जाण्याचा दिवस निश्चित केला.

यात्रेला जाण्याचा दिवस उजाडला चंदनमल भल्या पहाटेस उठला आणि बायकोलाही त्यानें उठविले.

सूचनेप्रमाणें भोलारामही पहाटेपूर्वींच मालकाच्या सेवेला हजर झाला. बिचारा भोलाराम अतिशय आज्ञाधारक आणि भोळ्या स्वभावाचा होता. त्याच्या ह्या भोळ्या स्वभावामुळेंच त्याला चंदनमल भोलाराम म्हणून हांक मारायचे. पुढे तेंच नांव कायम झाले.

चंदनमलचा भोलारामवरही मुलांप्रमाणें जीव होता. अत्यंत विश्वासू अज्ञाधारक आणि वृत्तीनें भोळा असलेला भोलाराम गेली पंचवीस वर्षे चंदनमच्या कृपाछायेखालीं लहानचा मोठा झाला होता.

चंदनमलशेठजींचा एकही शब्द तो खाली पडूं देत नसे. शब्दांचे पालन तो मोठ्या भक्तिभावानें करीत असे.

आपणाला शेठजींनी आईची माया, वडिलांचे प्रेम दिलेले आहे. त्यांचा शब्द मानणें हें आपलें कर्तव्य आहे. या भावनेनें आणि शेठजींवर असणाऱ्या प्रेमामुळें भोलाराम त्यांना आपलें सर्वस्व मानीत असे.

त्याच्या ह्या भोळेपणाचा, निस्वार्थ वृत्तीनें वागण्याचा व्यापारी चंदनमल पुष्कळ गैरफायदा घेत असे, ही गोष्ट वेगळी.

सकाळी भोलाराम उठल्यापासून तर भोलारामची अंथरूणाला पाठ टेकेपर्यंत शेठजी त्याच्याकडून एकसारखे काम करून घेतच असत.

किरकोळ कामापासून तर जोखमीची कामेही भोलाराम बिनबोभाटपणें व यत्किंचितही चुकारपणा न करतां पार पाडीत असे.

तीर्थयात्रेला जायचे म्हणजे पुष्कळ आडमार्गानें, डोंगरा डोंगरांतून नदीनाले ओलांडून जायचे होते. सगळा पायी प्रवास बैलगाडी किंवा घोडा यांचा प्रवासासाठीं कांहींच उपयोग नव्हता.

पायी प्रवास करूनच तीर्थयात्रेला जायचे होते, किती दिवस लागतील. अन् किती नाहीं, हें कळत नव्हते.

या सर्वांचा विचार करून शेठजींनी भरपूर द्रव्य, धान्य, कपडेलत्ते अंथरूण–पांघरूण बरोबर घेतले होते. आणि व्यवस्थित बांधूनही ठेवलें होते.

भोलाराम आलेला पाहतांच व्यापारी चंदनमलनें आपल्या मुलांचा निरोप घेतला व त्यांना योग्य त्या सूचनाही दिल्या आणि भोलारामला म्हटले, "भोलाराम आपण असं करू, तूं दोन गांठोडी घे, मी दोन घेतो आणि दोन गांठोडी तुझी मालकीण घेईल."

भोलारामने खालच्या मानानेच होकार दिला.

आणि भरगच्च सामानाने भरलेली प्रत्येकी दोन दोन गांठोडी घेऊन चंदनमलशेठजीं भोलारामसह तीर्थयात्रेच्या प्रवासाला निघाले.

बराच वेळ चालल्या नंतर मध्यान्हीचा समय झाला. तेव्हां खांद्यावरची गांठोडी, खालीं उतरून प्रत्येकाने दशम्या सोडल्या व थोडीशी विश्रांती घेतली आणि पुन्हां त्यांचा तीर्थयात्रेचा प्रवास सुरूं झाला.

बऱ्याच वेळानंतर त्या अवजड अशा ओझ्यानं चंदनमल शेठजींची मान आणि पाठ भरून आली. खांदाही दुखू लागला.

तेव्हां चंदनमलने पुढें जात असलेल्या भोलारामला हांक मारून म्हटलें, "अरे भोलाराम, अरे थांब ना, माझी मान, खांदा आणि पाठ बघ कशी भरून आलीय, तेव्हां तूं एक गांठोडं घे बघू. म्हणजे मलाही तुझ्यासारखं भरभर चालता येईल."

भोलाराम भोळाच होता बिचारा. त्यातून आज्ञाधारक. तो लगेच थांबला आणि म्हणाला, "बरंय धनी, द्या तुमचं ओझं माझ्या खांद्यावर."

आपल्या डोक्यावरचं ओझं भोलारामच्या खांद्यावर ठेवून चंदनमल शेठजींचा पुन्हां तीर्थयात्रेचा प्रवास सुरूं झाला.

थोडा वेळ चालल्यानंतर व्यापारी चंदनमल यांचा खांदा पुन्हां दुखू लागला, ठणकूं लागला. ते अवजड ओझे घेऊन चालणें जेव्हां अगदींच अशक्य झाले तेव्हां शेठजी ओझे घेऊन पुढें जाणाऱ्या भोलारामला म्हणाले, "अरे भोलाराम, अरे पळतोस कुठें ? थांब बघु, माझा खांदा बघ कसा ठणठण ठणका मारतोय, हें पण ओझे तूंच घे बघूं तुझ्या शिरावर. म्हणजे मला निदान तुझ्याबरोबर चालता तरी येईल."

"बरंय धनी" असें म्हणून भोलारामनें तेही ओझं स्वत:च्या डोक्यावर घेऊन तो तिर्थयात्रेचा मार्ग आक्रमण करूं लागला.

शेठजीना आतां पुष्कळच हायसं वाटू लागलं होतं. एखाद्या लहान मुलाप्रमाणें ते आतां उड्या मारीतच चालले होते.

शेठजींना उड्या मारीत चालत असतांना पाहून शेठाणीच्या मनांत आले आपणही मोकळं चाललं तर ! एव्हांना शेठाणीची

मान व खांदाही दुखूं लागला होता. त्या जड अशा अवजड ओझ्याने.

भोलाराम जाम थकला होता. चार ओझें सांभाळता सांभाळता त्याची अवस्थाही कठीण झाली होती. त्या अवजड अशा ओझ्यानें तो कसाबसा मार्ग आक्रमण करीत होता.

चंदनमल हंसतमुख होते. मोकळं चालतांना त्यांना एक प्रकारची हुषारी वाटत होती.

भोलारामला पुढें जात असतांना पाहून शेठाणीनें दवक्या आवाजांत हांक दिली, "अरे भोलाराम, ए भोलाराम."

शेठाणीचा आवाज ऐकतांच भोलाराम थांबला.


एव्हांना भोलाराम चांगलाच घामाघूम झाला होता. त्याच्या सर्वांगांतून घामाच्या धारा वाहात होत्या. त्यांतून पुन्हां अंगावर ओझं, उसासे टाकतच तो थांबला.

भोलाराम थांबलेला पाहताच शेठाणीनें आपलेही ओझें भोलारामच्या स्वाधीन केलें आणि स्वत: सुटकेचा श्वास सोडला.

थकलेला भागलेला भोलाराम एखाद्या गाढवागत ओझं बाळगीत कसेबसे संभाळीत, कण्हत बसत उठत चालला होता.

थोडा वेळ झाला असेल नसेल तोच... झालेल्या अतिश्रमानें भोलारामच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. पाय जागींच लटपट करूं लागले. आणि भोलाराम उभ्याउभ्याच एखादा वृक्ष उन्मळून पडावा तसा धाडकन् जमिनीवर पडला. अंगाखांद्यावरचे सर्व ओझें त्याच्या अंगावर पडले.

चंदनमलशेठजी घाबरून गेले. एकाएकी असं काय घडलं म्हणून ते धांवतपळतच भोलारामकडे धांवले.



भोलारामचा प्राण केव्हांच निघून गेला होता. थंड झालेले भोलारामचे कलेवर पाहून शेठजीला आपली चूक कळून आली. आपल्या मुर्खपणापायींच आपण एक चांगला प्रामाणिक आणि आज्ञाधारक नोकर गमावला यांचे त्यांना अतिशय दु:ख वाटूं लागले. पण आतां त्याचा उपयोग काय होता ?

आतां हें एवढं ओझं घेऊन पुन्हां मागें फिरावं कीं, पुढें जावं ह्याच विचारानं त्यांच्या मनांत काहूर निर्माण केलं होतं.

त्या ओझ्याकडे केविलवाणें पाहातच त्यांच्या हातापायांतील प्राण संपले आणि त्यांनीं हताशपणें जागींच बैठक मारली.

□ □

तपासले 30/3/08
ग्रा. वा.